# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

E-mail:ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in

दुरध्वनी क्र.२५६५१४३ फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३


क्रमांक :—तंशिस/प्राकाना/शैवि२/जिकौविकास /२०१२/3024

दि. 19 OCT 2012

प्रति,

प्राचार्य,

सर्व पदवीका /पदवी /पदव्युत्तरपदवी संस्था.

विषय :— कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी बाबत.

संदर्भ :— १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. ११/तंशिस/२०१२/३३, दि. ०१/१०/२०१२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, मा. पंतप्रधान यांच्या पंधराकलमी कार्यक्रमानुसार कौशल्य विकास कार्यक्रमाची महाराष्ट्र राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करावयाची आहे. याकरीता तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांना ४०,००० युवकांना दरवर्षी प्रशिक्षित करण्यांचे उध्दीष्ट देण्यांत आलेले आहे. सदरचे उध्दीष्ट प्रत्येक विभागामध्ये विभागून देण्यांत आलेले आहे. या विभागीय कार्यालयास ६,००० युवकांना प्रशिक्षित करण्यांचे उध्दीष्ट देण्यांत आलेले आहे. सदर उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यांच्या दृष्टीने वाजवी फी आकारुन व आपणाकडे असलेल्या यंत्रसामुग्री व साधन सामुग्री यांचा प्रशिक्षणाकरीता वापर करुन अल्पमुदतीचे अभ्यासक्रम निरंतर प्रशिक्षण योजनेंतर्गत राबविण्यांत यावे.

त्याचप्रमाणे अल्पसंख्यांक विकास योजनेंतर्गत एडीसीसी इन्फो कॅड यांचे ऑटोकॅड मधील विविध अभ्यासक्रम तसेच मेलन टेक्नॉलॉजी लिमीटेड, नवी दिल्ली यांचे सॅपचे अभ्यासक्रम राबविण्याकरीता शासन स्तरावर सामजस्य करार करण्यांत आलेले आहे. या प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे करण्यांत येतो. या अभ्यासक्रमाकरीता ५० विद्यार्थ्यांची बॅच (अल्पसंख्यांक विद्यार्थी ) तयार होत असल्यास वरील प्रशिक्षण राबविता येतो. विभागाला दिलेले उध्दीष्ट पूर्ण करण्यांच्या दृष्टीने उपरोक्त प्रशिक्षणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यांत यावी व प्रत्येक तीन महिन्यांचा प्रशिक्षणाचा अहवाल या कार्यालयास कळविण्यांत यावा.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.